1 5 JAN 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वि.स.खांडेकर महान साहित्यिक

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : विद्यापीठात खांडेकर जयंतिनिमित्त निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण

प्रतिनिधी

कोल्हापूर -

ज्येष्ठ साहित्यिक वि.स. खांडेकर यांचे कार्य पुढील पिढीला प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या रूपाने मराठी भाषेला महान साहित्यिक लाभला, असे मत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. वि. स. खांडेकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठाच्या वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालयातर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

संग्रहालयाच्या वतीने शालेय स्तरावर निबंध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक देवून गौरवण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते स्मृती संग्रहालयाविषयी तयार करण्यात आलेल्या 'वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय: एक दृष्टीक्षेप" या चित्रफीतीचे प्रकाशन करण्यात आले. संग्रहालयातर्फे घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेच्या पारितोषिक विजेत्यांनाही त्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व ग्रंथ भेट देऊन गौरविण्यात आले.



कोल्हापूर : वि.स. खांडेकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात निबंध स्पर्धेतील विजेत्यांबरोबर डॉ. डी. टी. शिर्के. डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. तृप्ती करिकट्टी, अभिजीत सोकांडे, उदयसिंह राजेयादव आदी.

डॉ. शिर्के म्हणाले, खांडेकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार लाभला. ही गोष्ट साहित्यिकांसाठी प्रेरणास्थान आहे. या संग्रहालयाला पर्यटकांसह शालेय विद्यार्थी भेट देतात. त्यामुळे खांडेकर स्मृती संग्रहालयाच्या माध्यमातून त्यांचे कार्य नवीन पिढीला समजावे, अशीच विद्यापीठाची भूमिका आहे.

संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप यांनी प्रास्ताविक केले. उदयसिंह राजेयादव यांनी आभार मानले. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. तृप्ती करिकट्टी, डॉ. एम. एस. वासवाणी, सुप्रिया खबाले, अभिजीत सोकांडे, अमृता कुलकर्णी-तुकतुके, राजश्री गिरी, सोनेश्वर सोलापुरे, धैर्यशील राजेभोसले, दिग्विजय राजेभोसले आदी उपस्थित होते.

दरम्यान खांडेकर स्मृती संग्रहालयाविषयी माहितीपट दाखवण्यात आला. या माहितीपदाची संकल्पना व निर्मिती राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनीची असून लेखन व दिग्दर्शन अभिजीत सोकांडे यांनी केले आहे. अमृता कुलकर्णी यांनी निवेदन केले असून कृष्णात कांबळे यांनी कॅमेरामन म्हणून तर सूरज कांबळे यांनी संकलन केले आहे. पंधरा मिनिटांच्या या माहितीपटात स्मृती संग्रहालयाच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला आहे.

**निबंध स्पर्धेतील विजेते : मोठा गट**

अनुष्का राजेभोसले (जय जोतिर्लिंग माध्यमिक विद्यालय, कोलोली) प्रथम, श्रुती शेटे (वि.स. खांडेकर प्रशाला, कोल्हापूर)व्दितीय, पल्लवी सुतार (जय जोतिर्लिंग माध्यमिक विद्यालय, कोलोली) तृतीय क्रमांक पटकावला.

**निबंध स्पर्धेतील विजेते : लहान गट**

संध्या सांगवे प्रथम, श्रेया राऊत व्दितीय, कोमल सबरद (सर्व- वि. स. खांडेकर प्रशाला, कोल्हापूर)तृतीय क्रमांक पटकावला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JAN 2018
पुढारी



**कोल्हापूर :** अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फेन्सिंग स्पर्धेसाठी निवड झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या संघासमवेत डॉ. पी. टी. गायकवाड, प्रा. राहुल मगदूम, प्रा. डॉ. धनंजय पाटील, विक्रम पाटील आदी.

# अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फेन्सिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ रवाना

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** अमृतसर येथील गुरूनानक देव विद्यापीठ येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फेन्सिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ रवाना झाला. ही स्पर्धा १७ ते १९ जानेवारीअखेर होणार आहे. संघात अक्षय देशमुख, मोरेश्वर पाटील, प्रतीक जाधव, ओंकार पाटील, श्रेयश कुऱ्हाडे, प्रतीक संकपाळ, राम यादव, यश कोळी आदी खेळाडूंचा समावेश आहे. खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, संचालक क्रीडा विभाग डॉ. पी. टी. गायकवाड, प्रा. राहुल मगदूम, प्रा. डॉ. धनंजय पाटील, विक्रम नांगरे-पाटील, ग्रॅब्रियल रॉड्रिक्स, प्रफुल्ल धुमाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# 'सेट - नेट हा शिक्षक होण्यासाठी गेटपास'

**कोल्हापूर :** स्पर्धात्मक युगात शैक्षणिक क्षेत्रामध्ये महाविद्यालयीन शिक्षक होण्यासाठी सेट- नेट होणे हाच एकमेव गेटपास आहे, असे प्रतिपादन दूर शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ एम. ए अनुसे यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्राच्यावतीने आयोजित दोन दिवसीय सेट - नेट परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी बोलत होते. सकाळच्या सत्रामध्ये डॉ मारुती लोंढे, डॉ. के. बी. पाटील, दुपारच्या सत्रामध्ये डॉ रुपाली संकपाळ, शिक्षणशास्त्र अधिविभागातील प्रा डॉ विद्यानंद खंडागळे यांनी विविध विषयांवर माहिती दिली.